असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे २, १९९७/वैशाख १२, शके १९१९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.—महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या शालेय-पूर्व केंद्रांची नोंदणी सक्तीची करणे आणि त्यांची प्रवेशाची कार्यपद्धती निर्धारित करणे व या केंद्रांनी पुस्तके विहित करण्यावर बंदी घालणे याकरिता तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | ४३०–४३५ |

दिनांक २९ एप्रिल १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २ मे १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या शालेय-पूर्व केंद्रांची नोंदणी सक्तीची करणे आणि त्यांची प्रवेशाची कार्यपद्धती निर्धारित करणे व या केंद्रांनी पुस्तके विहित करण्यावर बंदी घालणे याकरिता तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या, शालेय-पूर्व केंद्रांची नोंदणी सक्तीची करणे आणि त्यांची प्रवेशाची कार्यपद्धती निर्धारित करणे व या केंद्रांनी पुस्तके

विहित करण्यावर बंदी घालण्याची तरतूद करणे यासाठी आणि त्याच्याशी संबंधित वा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यामध्ये विशेष कायदा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व व्याप्ती. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शालेय-पूर्व केंद्रे (प्रवेशाचे विनियमन) अधिनियम, १९९६ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रवेश" म्हणजे, शालेय-पूर्व प्राधिकाऱ्याने, शैक्षणिक वर्षामध्ये, कामाच्या दिवसांत, बालकाला शालेय-पूर्व केंद्रामध्ये उपस्थित राहण्यासाठी दिलेली औपचारिक परवानगी ;

(ब) "समुचित प्राधिकारी" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये रचना करण्यात आलेल्या संबंधित जिल्हा परिषदेचा शिक्षणाधिकारी (प्राथमिक शिक्षण) किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये रचना करण्यात आलेल्या संबंधित नगरपरिषदेच्या पालिका शाळा मंडळाचा प्रशासकीय अधिकारी किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा, यथास्थिती, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना करण्यात आलेल्या संबंधित महानगरपालिकेचा शिक्षणाधिकारी ;

१९६२ चा महा. ५.
१९६५ चा महा. ४०.
१८८८ चा मुंबई ३.
१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.
१९४९ चा मुंबई ५९.

(क) "बालक" किंवा "बालके" म्हणजे, ज्याच्या/ज्यांच्या वयाला तीन वर्षे झालेली आहेत, परंतु पाच वर्षे झालेली नाहीत असे बालक किंवा अशी बालके ;

(ड) "व्यवस्थापन" म्हणजे, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० यांच्या तरतुदीन्वये शालेय-पूर्व केंद्राची व्यवस्था पाहण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह ;

१९५० चा मुंबई २९.
१८६० चा २१.

(इ) "जवळचे निवासी क्षेत्र" म्हणजे, शालेय-पूर्व केंद्राच्या व्यवस्थापनाकडून तसे क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले जवळपास असलेले क्षेत्र ;

(फ) "शालेय-पूर्व प्राधिकारी" म्हणजे, शालेय-पूर्व केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन, प्रशासन आणि ते चालवणे यांच्या आणि केंद्रामध्ये बालकांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनांसाठी अशा शालेय-पूर्व केंद्राच्या व्यवस्थापनाने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेला, शालेय-पूर्व केंद्राचा प्राचार्य किंवा प्रमुख किंवा प्रभारी ;

(ग) "शालेय-पूर्व केंद्र" म्हणजे, बालकांना शालेय-पूर्व अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी चालविले जाणारे, खाजगी शिशु केंद्र, बालवर्ग, बालवाडी किंवा बालमंदिर किंवा कोणत्याही नावाने ओळखले जाणारे कोणतेही अन्य खाजगी शालेय-पूर्व केंद्र.

शालेय पूर्व केंद्राची नोंदणी. ३. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक शालेय-पूर्व केंद्राचे व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या किंवा त्यानंतर सुरू करण्यात आलेल्या शालेय-पूर्व केंद्राची, कलम ४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, समुचित प्राधिकाऱ्याकडे नोंदणी करील.

शालेय-पूर्व केंद्रांच्या नोंदणीची रीत. ४. (१) प्रत्येक शालेय-पूर्व केंद्राचे व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यातील व असे व्यवस्थापन किंवा शालेय प्राधिकारी यांनी या बाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या सहीने,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला अस्तित्वात आलेल्या शालेय-पूर्व केंद्राच्या बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत ; आणि

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर ज्या दिनांकाला शालेय-पूर्व केंद्र सुरु करण्यात आले असेल त्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत,

समुचित प्राधिकाऱ्याकडे ज्ञापन सादर करील.

(२) ज्ञापनासोबत रुपये पाचशे एवढी फी भरण्यात येईल.

(३) समुचित प्राधिकारी अशा सर्व शालेय-पूर्व केंद्रांची नोंदवही ठेवील.

(४) प्रत्येक शालेय-पूर्व केंद्राचे व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी, प्रत्येक विद्यावर्षाच्या शेवटी, त्याने पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या ज्ञापनामध्ये दिलेल्या माहितीत काही बदल असल्यास ते बदल समुचित प्राधिकाऱ्याला कळवील.

५. प्रत्येक शालेय-पूर्व केंद्रांचे व्यवस्थापन किंवा प्राधिकारी, जवळच्या निवासी क्षेत्रामध्ये राहणाऱ्या मुलांना, अशा केंद्रामध्ये त्यांचा धर्म, वंश, जात किंवा लिंग यांचा विचार न करता अग्रक्रमाने अशा केंद्राच्या प्रवेश देण्याच्या एकूण क्षमतेच्या ऐंशी टक्के एवढ्या मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्रवेश देण्याच्या एकूण क्षमतेमधील उरलेल्या वीस टक्क्यांच्या बाबतीत त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार प्रवेश देऊ शकेल : शालेय-पूर्व केंद्रांमध्ये प्रवेश देण्याची कार्यपद्धती.

परंतु, एखाद्या विद्यावर्षाकरिता जवळच्या निवासी क्षेत्रामधून प्रवेशाकरिता आलेल्या अर्जांची संख्या, अशा प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या जागांपेक्षा अधिक होत असेल तर, शालेय-पूर्व केंद्रांचे व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकरण, सरसकट चिठ्ठ्या टाकून मुलांना प्रवेश देईल :

परंतु, आणखी असे की, जवळच्या निवासी क्षेत्रामधून प्रवेशाकरिता आलेल्या अर्जांची संख्या अशा प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या जागांपेक्षा कमी असेल तर, सरसकट चिठ्ठ्या टाकून, इतर क्षेत्रांमधून आलेल्या मुलांना प्रवेश देण्यात येईल.

६. शालेय-पूर्व केंद्रांचे व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी शालेय-पूर्व केंद्रांमध्ये मुलाला प्रवेश देण्याच्या प्रयोजनासाठी मुलांची किंवा त्याच्या पालकांची कोणतीही मुलाखत किंवा मौखिक परीक्षा किंवा लेखी परीक्षा घेणार नाही. मुलाखतीवर बंदी घालणे.

७. शालेय-पूर्व केंद्राचे व्यवस्थापन, किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी शालेय-पूर्व केंद्रांमध्ये प्रवेश दिलेल्या मुलांच्या अनौपचारिक शालेय-पूर्व शिक्षणांकरिता कोणतेही विशिष्ट पुस्तक, पुस्तकांचा संच किंवा पुस्तिका, विहित करणार नाही. शालेय-पूर्व अनौपचारिक शिक्षणाकरिता पुस्तक विहित करण्यावर बंदी घालणे.

८. (१) समुचित प्राधिकारी, कोणतीही तक्रार आल्यावर किंवा अन्यथा कोणत्याही शालेय-पूर्व केंद्रांच्या व्यवस्थापनाने किंवा शालेय-पूर्व प्राधिकाऱ्याने किंवा शालेय-पूर्व केंद्र चालविण्याचा प्रभार जिच्याकडे आहे किंवा असे केंद्र चालविण्याची जबाबदारी जिच्यावर आहे अशा व्यक्तीने, ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे याबद्दल त्याची खात्री पटल्यास, असा समुचित प्राधिकारी, अभिकथित तक्रारीची किंवा अशा शालेय-पूर्व केंद्रांच्या व्यवहारांची चौकशी करू शकेल किंवा गट-अ च्या राजपत्रित अधिकाऱ्यापेक्षा खालच्या दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला अशी चौकशी करण्यासाठी किंवा अशा व्यवहारांची चौकशी करण्यासाठी आणि त्या संबंधातील अहवाल सादर करण्यासाठी प्राधिकृत करू शकेल. चौकशी करण्याची कार्यपद्धती.

(२) कोणत्याही शालेय-पूर्व केंद्रांचे अधिकारी, कर्मचारी किंवा सदस्य, शालेय-पूर्व केंद्रांच्या व्यवहारासंबंधातील किंवा कामकाजाच्या संबंधातील त्यांना असलेली कोणतीही माहिती, समुचित प्राधिकाऱ्याने किंवा यथास्थिती, पोट-कलम (१) मध्ये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, अशी माहिती सादर करण्यास त्यांना सांगितल्यास ती सादर करतील.

(३) चौकशी करतेवेळी, समुचित प्राधिकारी किंवा पोट-कलम (१) मध्ये प्राधिकृत केलेला अधिकारी यांना कोणताही पदाधिकारी, कर्मचारी, सदस्य, व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी यांना उपस्थित राहण्यास फर्माविण्याचे आणि उपस्थित राहाण्यास भाग पाडण्याचे तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ द्वारे दिवाणी न्यायालयाच्या प्रकरणामध्य तरतूद केलेल्या मार्गानेच व शक्यतोवर अशाप्रकारे तरतूद केलेल्या रीतीनेच साक्ष देण्याची आणि दस्तऐवज सादर करण्याची सक्ती करण्याचे अधिकार असतील. १९०८ चा

(४) या कलमाखालील चौकशी पूर्ण झाल्यावर व त्या चौकशीच्या अहवालाचे अवलोकन केल्यावर, ह्या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाले असल्याबद्दल समुचित प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, अशा उल्लंघनाबद्दल व्यवस्थापन किंवा शालेय-पूर्व प्राधिकारी किंवा शालेय-पूर्व केंद्राच्या कामकाजाचा प्रभार ज्याच्याकडे असेल अशी प्रभारी व्यक्ती किंवा अशा कामकाजास जबाबदार असणारी व्यक्ती यांच्यावर खटला भरण्यास समुचित प्राधिकारी सक्षम असेल.

शास्ती. ९. जो कोणी, ह्या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्याला, अपराध सिद्ध झाल्यावर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल व दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्य-दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

वाजवी कारणा-शिवाय केलेल्या आरोपा-करिता भरपाई. १०. जेव्हा ह्या अधिनियमाखालील अपराधाच्या न्यायचौकशीत आरोप करण्याकरिता वाजवी कारण नव्हते असे दंडाधिकाऱ्याचे मत असेल तर तो, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५० अन्वये फिर्यादी किंवा खबऱ्याच्याविरुद्ध कारवाई करू शकेल. १९७४ चा

या अधिनियमा-खाली केलेल्या कारवाईला संरक्षण देणे. ११. या अधिनियमाअन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टी-बद्दल राज्य शासन किंवा शासनाचा किंवा जिल्हा परिषदेचा किंवा नगरपरिषदेचा किंवा महानगर-पालिकेचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार. १२. (१) राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, असा नियम, अशी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच, यथास्थिती, अंमलात येईल किंवा पुढीच अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

### नमुना

(कलम ४ पहा)

शालेय-पूर्व केंद्रांच्या नोंदणीकरिता ज्ञापन

(१) शालेय-पूर्व केंद्राचे नाव :

(२) पत्ता :

(३) नाव आणि पत्ता :

(अ) शालेय-पूर्व केंद्रांच्या व्यवस्थापनाचे आणि

(ब) शालेय-पूर्व प्राधिकाऱ्याचे

(४) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० आणि/किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये शालेय-पूर्व केंद्रांच्या व्यवस्थापनाच्या नोंदणीबाबतची माहिती :

(५) शालेय-पूर्व केंद्र सुरू झाल्याचा दिनांक :

(६) शालेय-पूर्व केंद्रांमध्ये प्रवेशासाठी मुलाचे विनिर्दिष्ट करण्यात आलेले वय---

(अ) किमान :

(ब) कमाल :

(७) केंद्राची एकूण प्रवेश क्षमता :

(८) चालू विद्या-सत्रामध्ये, वयानुसार देण्यात आलेले प्रवेश---

(अ) चार वर्षांपर्यंत :

(ब) चार आणि पाच वर्षांदरम्यान :

(क) पाच व सहा वर्षांदरम्यान :

(९) शालेय-पूर्व केंद्राचे दैनंदिन कामाचे तास :

(१०) शालेय-पूर्व केंद्रांमध्ये नियुक्त केलेल्या अध्यापक वर्गाचा तपशील :

| अनु-क्रमांक | अध्यापकाचे नाव | वय | शैक्षणिक अर्हता | प्रशिक्षण विषयक अर्हता |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

(११) शालेय-पूर्व केंद्रांमध्ये पुरविण्यात आलेल्या प्रत्यक्ष आणि इतर सुविधा :

शालेय-पूर्व केंद्रांचे व्यवस्थापन/शालेय-पूर्व प्राधिकारी
यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई